पोलीस स्टेशन, कोराडी नागपूर शहर



# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नागपुर शहर **P.S.(ठाणे):** कोराडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0051 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/02/2025 23:40

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 05/02/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/02/2025

**Time From (वेळेपासून):** 12:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:48 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/02/2025 **Time (वेळ):** 22:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 055

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/02/2025 23:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस ठाणे कोराडी नागपूर ,शहर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री त्रीषील विजय खोब्रागडे वय 42 वर्ष

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट नं 67 बी, प्रवेष नगर,वांजरी लेआउट, नागपूर 26,नागपुर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॉट नं 67 बी, प्रवेष नगर,वांजरी लेआउट, नागपूर 26,नागपुर शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9011178740

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | PREMANAND DADARAO KATRE | | | 1. श्रीमती ललीता लिल्हारे यांचे , घरी किरायाने,आर्य नगर, कोराडी,रोड, ठाकुर आटा चक्की जवळ,नागपूर ,कोराडी,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | दि.25.01.25 रोजी सुनंदा ठाकरे यांनी अनिकेत व त्रिशील खोब्रागडे यांचे विरुद्ध दिलेले तक्रारअर्ज | 0.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 दराच्या 80 चलनी नोटा व बाकी 1,60,000 च्या 500 दराच्या 320 नोटा (लहान मुलांच्या खेळण्यातील) | 200,000.00 |
| 3 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | मेमोरीकार्ड डॅनडिस्क कपनीचा | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
200,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (**प्रथम खबर हकीकत** ):
अप. क्र. व कलम – 51/2025 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 (सुधारणा सन 2018 )
तक्रारदार चे नाव व पत्ता – श्री त्रीषील विजय खोब्रागडे, वय 42 वर्ष, व्यवसायः- वकील, रा. प्लॉट नं 67 बी, प्रवेश नगर, वांजरी लेआउट, नागपूर 26
घटनास्थळ – पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर
गुन्हा घडला ता. वेळ – दि.05/02/2025 चे 12/40 वा ते 13/48 वा चे दरम्यान
आरोपी नाव,हुद्दा व पत्ता – श्री प्रेमानंद दादाराव कात्रे वय 43 वर्ष, पद-सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर ह.मु. श्रीमती ललीता लिल्हारे यांचे घरी किरायाने,आर्य नगर,कोराडी रोड, ठाकुर आटा चक्की जवळ, नागपूर. मुळ पत्ता-प्लॉट नं 15, मेघे ले आउट,विद्युत नगर अमरावती, जिल्हा अमरावती.
अटक तारीख वेळ – निरंक
लाच मागणी रक्कम --- 2,00,000/-रू
स्वीकारलेली रक्कम – 2,00,000/-रू
जप्त रक्कम – लाच रक्कम 2,00,000/-रू,
दाखल अधिकारी – गणेश सत्यनारायण पाठक, श्रेणी पोलीस उपरिनीक्षक,ब.नं 4749, पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर
तपासी अधिकारी – पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर

फिर्याद

कॅम्पः विद्युत विहार कॉलोनी परिसर, कोराडी नागपूर, पोलीस ठाणे कोराडी, नागपूर शहर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर
दिनांक 05/02/2025
नावः- श्री त्रीशील विजय खोब्रागडे, वय 42 वर्ष,व्यवसायः- वकील रा. प्लॉट नं 67 बी, प्रवेष नगर, वांजरी लेआउट, नागपूर 26 मो.क्र 9011178740

मी वर दिलेल्या पत्यावर परिवारासह राहत असुन दि.04/02/2025 रोजी पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे समक्ष लोकसेवकांविरूध्द लाच मागणी संबंधाने मी माझे स्वहस्तांक्षरात

मराठी भाषेत लेखी तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर मराठीत टंकलिखीत करून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

तक्रार -- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर दिनांक .04/02/2025 वेळः- 14/00 वा

नावः- श्री त्रीषील विजय खोब्रागडे, वय 42 वर्ष,व्यवसायः- वकील रा. प्लॉट नं 67 बी, प्रवेश नगर, वांजरी लेआउट, नागपूर 2 मो.क्र 9011178740

मी समक्ष अँन्टी करप्षन ब्युरो कार्यालय येथे हजर येवून माझी तक्रार देतो की, मी वरिल पत्त्यावर माझे परिवारासह राहतो. मी जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर येथे वकील म्हणून काम करतो. तसेच मी स्थावर मालमत्तेबाबतचे कागदपत्रे (खरेदी-विक्री,गहाणखत,विक्री करारनामा,बक्षीसपत्र ई) तयार करण्याचे काम करून मी नमुद कागदपत्रे रजिस्ट्रार समोर रजिस्ट्री करीता ठेवत असतो.

माझे पक्षकार अनिकेत हरीश्चंद्र करवाडे, वय 34 वर्ष, धंदा-शेती, रा प्लॉट नं 559,यशोधरा नगर,वांजरी लेआउट,नागपूर यांनी नागपूर जिल्हयातील तहसील कामठी मौजा कवठा,पहनं 15 अ,आरा.जी 1.54 हे.आर (पावणे चार एकर),खसरा नं 40,खाते क्र 334 ही शेती 1) श्रीमती सुशीला ईश्वर ठाकरे,2) श्रीपाल ईश्वर ठाकरे , 3) कु सविता ईश्वर ठाकरे,4) अमोल ईश्वर ठाकरे,5)शरद कवडु ठाकरे,6) सचिन कवडु ठाकरे,7) सुनंदा कवडु ठाकरे,8) सारीका प्रशांत जळीतकर,1 ते 5 रा मातामाय मंदीर जवळ कवठा ता कामठी जि नागपूर,6 व 7 राहणार विद्युत विहार कॉलोनी कोराडी ता कामठी जि नागपूर, 8 राहणार बुद्ध विहाराजवळ, खापरखेडा नागपूर यांचेकडून दिनांक 15/02/2019 रोजी 1,90,00,000/-रू मध्ये विकत घेण्याचा नोटरी करारनामा केला होता दिनांक 15/01/2025 रोजी रजिस्ट्रार कार्यालय कामठी येथे माझे पक्षकार अनिकेत हरीश्चंद्र करवाडे यांनी वर नमुद शेतीची रजिस्ट्री केली. त्याचे नोंदणीकृत दस्त क्र 573/2025 दिनांक 15/01/2025 असा आहे. शेती विकत घेण्याचा नोटरी करारनामानुसार माझे पक्षकाराने समोरील पार्टीला धनादेश/आर.टी.जी.एस/ऑनलाईन तसेच काही पैसे नगदी स्वरूपात देवून संपूर्ण रक्कम अदा केली आहे दिनांक 22/01/2025 रोजी सायंकाळी नमुद शेती विकणारे सुनंदा कवडू ठाकरे यांचा भाउ श्री पांडुरंग जीचकार, वय 65 वर्ष, रा तोंडाखैरी, ता कळमेश्वर जि नागपूर यांनी त्यांचे मो.क्र 9764916480 वरून मला व माझे पक्षकाराला खोटे विक्रीपत्र तयार केले असा आरोप आमचेवर ठेवला व त्यांनी मला तुम्हाला पाहुन घेवू अशी धमकी दिली. तसेच दिनांक 23/01/2025 रोजी शरद ठाकरे याने त्यांचे फोन क्रमांक 8766726923 वरून माझे पक्षकार अनिकेत करवाडे याचे फोन 9325688612 वर सायंकाळी 5/00 वा व रात्री 8/30 वा फोन करून शेतात जावु देणार नाही, शेतात टॅक्ट्रर लावून घेतो,शेतीकडे जाणारे रोडवर येणेजाणे बंद करणार , तुम्हाला ट्रकचे खाली कुचलतो अशी धमकी दिली. यावरून माझे पक्षकाराने दिनांक 24/01/2025 रोजी नमुद बाबत पोलीस ठाणे यशोधरानगर, नागपूर शहर येथे लिखीत तक्रार अर्ज 1) श्री पांडुरंग जीचकार, वय 65 वर्ष, रा तोंडाखैरी, ता कळमेश्वर जि नागपूर,2) शरद कवडू ठाकरे, वय 42 वर्ष, रा माता माय मंदीर जवळ,कवठा ता कामठी जि नागपूर,3) सचिन कवडू ठाकरे, वय 33 वर्ष, 4) सुनंदा कवडू ठाकरे, वय 57 वर्ष, दोन्ही रा विद्युत विहार,केटीपीएस कॉलोनी कोराडी ता कामठी जि नागपूर यांचेविरूद्ध सादर केला. तसेच दिनांक 30/01/2025 रोजी नमुद लिखीत अर्जाची एक प्रत पोलीस आयुक्त नागपूर, अप्पर पोलीस आयुक्त,उत्तर प्रादेशिक विभाग नागपूर शहर यांना व पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर येथे रजिस्ट्रर पोस्टाने पाठवीली आहे दिनांक 25/01/2025 रोजी मो.क्र 8007625700 वरून सायंकाळी अंदाजे 4 ते 5 वाजता चे दरम्यान माझे वरिल मोबाईल क्रमांकावर फोन आला व त्यांनी अनिकेत आणि माझेविरूद्ध सुनंदा ठाकरे यांनी शेतीच्या कागदपत्रामध्ये बदल करून फसवणूक केल्याबाबतचा तक्रार अर्ज केल्याचे सांगून दोघेही पोलीस स्टेशन येथे या असे कळवीले. परंतु दिनांक 25/01/2025 रोजी मी आणि अनिकेत पोलीस स्टेशन येथे न जाता आम्ही दोघेही दिनांक 29/01/2025 रोजी पोलीस स्टेशन कोराडी नागपूर शहर येथे गेलो होतो. त्यानंतर आमचेविरूद्ध दाखल असलेल्या अर्जाचे चौकशी अधिकारी श्री कात्रे साहेब यांनी आम्हाला आमचेविरूद्ध दाखल असलेल्या अर्जाबाबत माहिती देवून मला अर्ज वाचण्यास दिला. त्यानंतर त्यांनी आमचेविरूद्ध अर्ज करणारी श्रीमती सुनंदा ठाकरे व आम्हाला परत बोलावीणार असे सांगीतले दिनांक 31/01/2025 रोजी चौकशी अधिकारी श्री कात्रे साहेब यांनी त्यांचे मो.क्र 8007625700 वरून माझे फोनवरती सकाळी 11/00 वा चे दरम्यान फोन करून आज रोजी तुम्ही दोघेही पोलीस स्टेशन येथे या असे सांगीतले. यावरून मी,माझे पक्षकारासह पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर येथे गेलो असता तिथे आमचेविरूद्ध अर्ज करणारी श्रीमती सुनंदा कवडु ठाकरे व तिचेबरोबर 5 ते 6 लोक आमचेपूर्वीच हजर होते. चौकशी अधिकारी श्री कात्रे साहेब यांनी आम्हा दोन्ही पार्टीला बसवुन नमुद प्रकरणात काय करणार असे विचारले, तर मी व माझे पक्षकार यांनी शेती विकणारी पार्टी यांना 8 लाख रू प्रति एकर वाढूवन देणार असे सांगीतले. तर समोरील पार्टी यांनी नकार देवून आम्हाला सरासरी 20 लाख रु देवून विषय संपवून टाका

असे म्हटले. चौकशी अधिकारी श्री कात्रे साहेब यांनी आम्हा दोन्ही पार्टीला आपसात करारनामा बनवून मला आणुन द्या असे बोलले. त्यानंतर समोरील पार्टी ही पोलीस ठाणे येथुन निघून गेली. मला व माझे पक्षकार यांना चौकशी अधिकारी श्री कात्रे साहेब यांनी थांबवून ठेवून ''मी तुमचे सेटलमेंट करून देत आहे तुम्ही मला 2 लाख रुपये द्या'' असे म्हटले. त्यानंतर आम्ही दोघेही पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर येथुन निघुन गेलो दिनांक 03/02/2025 रोजी दुपारी 4/30 वा ते 5/00 वा चे दरम्यान चौकशी अधिकारी श्री कात्रे साहेब यांनी सांगीतल्यानुसार आपसात करारनाम्याचा ड्राफ्ट बनवून ज्यावर कोणाचीही सही नाही पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर येथे गेलो. मी चौकशी अधिकारी श्री कात्रे साहेब यांना करारनामा चा बनवीलेला ड्राफ्ट दाखवीला ज्यामध्ये 1)शरद कवडु ठाकरे,2) सचिन कवडू ठाकरे,3) सुनंदा कवडु ठाकरे,4) सारीका प्रशांत जळीतकर यांचे प्रत्येकी 5 लाख रू असे एकूण 20 लाख रुपये 12 महिन्यात देण्याचे ठरवीण्यात आले आहे. नमुद ड्राफ्ट चौकशी अधिकारी श्री कात्रे साहेब यांना मी दिला, त्यांनी तो बघून मी समोरील पार्टीला उद्या बोलावून सांगतो. मी सांगीतलेले 2 लाख रुपये घेवून या असे म्हटले. माझे मोबाईल मधील कॉल लॉगच्या हिस्ट्रीमध्ये वरील नमुद कॉल डिटेल्स दिसून येत नसल्याने सध्या मी केलेल्या आउटगोईंग कॉल व इनकमींग कॉल ची वेळ अंदाजीत सांगीतलेली आहे. गै.अ श्री कात्रे साहेब,पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर यांनी मागीतलेली 2 लाख रू लाच रक्कम मला द्यायची मुळीच ईच्छा नसल्याने आज दिनांक 04/02/2025 रोजी गै. अ यांचेविरूद्ध तक्रार देण्यास आलो आहे. मी कारवाई करीता माझे बचतीतील 40,000 /- रू जमा करीत आहे. तक्रारीसोबत माझे पक्षकार यांनी पोलीस ठाणे यशोधरानगर नागपूर शहर येथे केलेल्या तक्रार अर्जाची छायांकीत प्रत,मौजा कवठा येथील शेतीच्या रजिस्ट्रीची छायांकीत प्रत व आपसी करारनामा याचा बनवीण्यात आलेल्या ड्राफ्ट ची छायांकीत प्रत सादर करीत आहे त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे यांनी दोन्ही पंचांना सविस्तर हकीकत सांगुन माझी तक्रार पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर दोन्ही पंचांनी माझ्या हस्तलिखीत व टंकलिखीत तक्रारीवर सह्या केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे यांनी स्वाक्षरी केली त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे यांनी मी कार्यवाही करीता वैयक्तिक बचतीतुन सादर केलेल्या 40,000/- रूपयाच्या चलनी नोटा ज्यामध्ये 500/रू दराच्या 80 नोटांना तसेच उर्वरीत 1,60,000/-रू च्या 500 रू दराच्या 320 नोटा (लहान मुलांच्या खेळण्यातील) असे एकूण 2,00,000/-रूपयांना माझे व पंचासमक्ष अँन्थ्रासीन पावडर लावण्यात येणार असे सांगून सदरच्या नोटा एका कागदी लिफाप्यात ठेवण्यात येणार असल्याचे सांगीतले तसेच व्हाईस रेकॉर्डर कशाप्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहिती देवून केलेल्या कार्यवाहीचे प्रात्याक्षिक करून दाखवीले. आज दिनांक 4/02/2025 रोजी त्यांची नाईट ड्युटी असल्याची खात्रीशीरपणे गोपनिय माहिती प्राप्त करून मी श्री कात्रे साहेब यांना उद्या दिनांक 05/02/2025 रोजी कार्यालयीन दुपारचे वेळी भेटायला जाणार तेव्हा त्या वेळेत पुढील कार्यवाही करू असे दोन्ही पंच व सापळा टिमसमक्ष सांगीतले. यावरून सर्वानुमते सापळा पडताळणीची पुढील कार्यवाही दिनांक 05/02/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरवीण्यात आले. पोनी शेंडे यांनी मला संपूर्ण सापळा कार्यवाहीच्या गोपनियतेच्या सुचना देवून उद्या सकाळी 11/00 वा कार्यालयात हजर राहण्यास सांगीतले . याबाबत प्रात्याक्षीक पंचनामा मध्ये सविस्तर नोंदी घेण्यात आलेल्या आहेत दिनांक 04/02/2025 रोजी मला दिलेल्या सुचनेप्रमाणे मी आज दि 05/02/2025 रोजी पोनि प्रिती शेंडे व त्यांची टिम ही अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय नागपूर येथे हजर असल्याने मी त्या ठिकाणी माझे दुचाकी वाहन क्र. एम.एच-31-डी.क्यु-2816 ने सकाळी वेळ 11/00 वा पोहचलो. पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे व त्यांची टिम आणि दोन्ही शासकीय पंचासह तिथे सापळा कार्यवाहीचे सर्व साहित्यासह खाजगी व शासकीय वाहनाने हजर होते. त्यानंतर सापळा अधिकारी यांनी मला सापळा कार्यवाही करीता योग्य ठिकाण कोणते राहणार याबाबत विचारणा केली असता, मी त्यांना विद्युत विहार कॉलोनी परिसर,कोराडी नागपूर असे सांगीतल्याने तसेच पोलीस स्टेशन व सदर कॉलोनीचे अंतर जवळ असल्याने तिथुनच सापळा कार्यवाही करण्याचे ठरवीण्यात आले. त्यानंतर अन्टी करप्शन ब्युरो कार्यालय नागपूर येथुन मी माझे दुचाकी वाहन क्र. एम.एच-31-डी.क्यु-2816 ने वेळ 11/50 वा विद्युत विहार कॉलोनी कोराडी नागपूर येथे जाण्यास निघालो व अँन्टी करप्शन ब्युरो ची टिम त्यांचे खाजगी व शासकीय वाहनाने सर्व साहित्यासह रवाना होवून वेळ 12/27 वा आम्ही सर्वजन विद्युत विहार कॉलोनी परिसर,कोराडी नागपूर येथे पोहचलो

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pravin pandurang pande(I (Inspector)) / DGPPPPM800 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

05/02/2025

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

GPSI / 
Dt. 05/02/2025

ड्युटी अधिकारी पोलीस ठाणे, कोराडी नागपूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): pravin pandurang p

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): DGPPPPM800

मला सापळा पडताळणी करीता जाणे असल्याने माझी सापळा पथकातील सदस्यांनी पंचासमक्ष पडताळणी पुर्वीची अंगझडती घेतली. त्यांनतर मला गै.अ कात्रे साहेब यांचेकडे जाणे असल्याने पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे यांनी पंचासमक्ष गैरअर्जदार यांची लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. तसेच सापळा पडताळणी कार्यवाही वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ 12/40 वा. एक नविन सिलबंद मेमोरी कॉर्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन रेकॉर्डर सुरु करून रेकॉर्डरमध्ये पंच क्र. 1 श्री.सौरभ कावळे यांचा आवाज रेकॉर्ड करुन त्यांचेसोबत मला गै.अ. कात्रे साहेब यांची लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरीता पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर येथे पाठवीले व सापळा अधिकारी व त्यांची टिम विद्युत विहार कॉलोनी परिसर,कोराडी नागपूर येथे थांबून राहीले. त्यानंतर मी, पंच क्र 1 यांचेसह पोलीस ठाणे कोराडी येथील गै.अ कात्रे साहेब यांच्या रूममध्ये जावून त्यांचेसोबत बोलणी केली. त्यांच्यात व माझ्यात औपचारीक बोलणे झाल्यानंतर माझेविरूद्ध असलेल्या तक्रारीचे काय करणार हे माहित करून घेण्यासाठी मी त्यांना '' माझेविरूद्ध असलेल्या तक्रारीचे काय करणार आहात'' असे म्हणून तुम्ही सांगीतल्याप्रमाणे मी करून देतो असे बोललो. त्यानंतर त्यांनी मला माझे व माझे पक्षकार अनिकेत करवाडे विरूद्ध दाखल असलेल्या तक्रार अर्जाबाबत तक्रार अर्ज करणारी श्रीमती सुनंदा ठाकरे यांचेसोबत सेटलमेंट करून देण्याकरीता 2 लाखाची मागणी केली. तसेच त्यांनी दिड मध्ये करून टाकू तुमचेही करून टाकू असेही ते बोलले. त्यानंतर मी त्यांना माझेविरूद्ध दाखल असलेल्या अर्जाबाबत काय करणार याबाबत विचारले असता, त्यांनी मला त्यांचा स्टेटमेंट घेवून त्या अर्जावर काही कारवाई करायची नाही असे लिहुन घेवून मी दिलेल्या डाª फटमध्ये काही करेक्षन असल्यास त्या मध्ये करून टाकू असे ते माझे सोबत बोलत होते. त्यांनी माझे व माझे पक्षकार यांचेविरूद्ध असलेल्या अर्जामध्ये सेटलमेंट करण्यासाठी लाच रक्कम मागीतल्याने मी तिथुन पंच क्र 1 यांचेसह पोनि प्रिती शेंडे व सापळा टिम थांबून असलेल्या ठिकाणी विद्युत विहार कॉलोनी कोराडी नागपूर येथे परत येवुन पोनी प्रिती शेंडे यांनी पंच क्र 1 यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर वेळ 12/54 वा बंद केला. परत आल्यावर माझी पुन्हा सापळा पथकातील सदस्य यांनी सापळा पडताळणी नंतरची अंगझडती घेतली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण दोन्ही पंच व सापळा पथकासमक्ष ऐकून तक्रारीमध्ये नमुद असलेल्या बाबीप्रमाणे गै.अ कात्रे साहेब हे माझे व माझे पक्षकाराविरूद्ध दाखल असलेल्या अर्जाची सेटलमेंट करण्याकरीता लाचेची मागणी करीत असल्याचे माझे व गै.अ कात्रे साहेब यांचेमध्ये व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेल्या संभाषणावरून सापळा पथकाने खात्री केली.

CASI / [signature]
Dt 05/02/2025
सापळा अधिकारी

गै.अ श्री.कात्रे साहेब यांना लाच रक्कम आज दिनांक 05/02/2025 रोजी यांना देणे असल्याने लगेच सापळा कार्यावाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच गै.अ श्री कात्रे साहेब यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर सापळा अधिकारी यांना मी माझे व्हॉट्सअँप वरून अंगठा (Thumb sign) मॅसेज करण्याचा नियोजीत इशारा मला सांगीतला. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी/सदस्य इशारा मिळताच लाच स्विकारणा-यास रंगेहात पकडतील असे सांगीतले.

त्यानंतर विद्युत विहार कॉलोनी,कोराडी नागपूर येथे सापळा कार्यवाही पुर्वीची सापळा पथकातील सदस्य यांनी माझी अंगझडती दोन्ही पंचासमक्ष घेवुन, अँथ्रासीन पावडर लावलेले 2,00,000/- रू ; 500/रू दराच्या 80 चलनी नोटा व उर्वरीत 1,60,000 रू च्या 500 दरच्या 320 लहान मुलांच्या खेळण्यातील नोटा ) मला पंच क्र. 2 श्री मोहनिश गुळांदे यांचे हस्ते लाचरक्कम ठेवून असलेल्या कागदी सिलबंद लिफाप्यामधून काढून त्यांचे उजव्या हाताने माझे वकीलाचा काळा कोट घातलेल्या उजव्या खिष्यात ठेवल्या. त्यानंतर लागलीच पंच क्र 2 यांनी त्यांचे दोन्ही हात साबणाने स्वच्छ करून पाण्याने धुवून घेतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रिती शेंडे यांनी दोन्ही पंचांसमक्ष, पुन्हा एकदा व्हाईस रेकॉर्डर सुरू त्याच मेमोरी कॉर्ड मध्ये वेळ 13/35 वा पंच क्र. 1 सौरभ कावळे यांचे आवाजात ध्वनिमुद्रीत केल्यानंतर धाग्याच्या सहायाने माझे गळयात अडकवुन दिला. मी, पंच क्र 1 यांचेसह गै.अ कात्रे साहेब यांना लाच रक्कम देण्याकरीता पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर येथे माझे दुचाकी वाहनाने गेलो. माझे मागोमाग सापळा अधिकारी व सापळा टिम हे पोलीस स्टेशन कोराडी नागपूर चे आजुबाजुस आडोश्याला उपस्थित होते. मी गै. अ कात्रे साहेब यांचेकडे त्यांचे कॅबीनमध्ये गेलो असता, तीथे एक पोलीस कर्मचारी बसलेले असून ते त्यांचे काम करीत असल्याचे दिसून आले. त्यानंतर पंच क्र 1 यांना दार ओढून घ्या असे गै.अ कात्रे साहेब यांनी ईशा-याने म्हणताच त्यांनी अर्धवट दार ओढून व ते दारातच थांबल्याने त्यांनी माझे व गै.अ कात्रे साहेब यांचेमध्ये झालेले लाच रक्कमेसंबधीचा देवाणघेवाण बघीतला आहे. मला गै.अ. कात्रे साहेब यांनी किती आणले,असे विचारल्यानंतर मी त्यांना तुम्ही जे म्हटले होते ते आणल्याचे सांगीतले. त्यानंतर त्यांनी माझेकडे बघून किती आहे, 2 आहेत काय? अशाप्रकारे प्रश्नार्थक विचारून त्यांनी माझेसमोर त्यांचा उजवा हात समोर केला तेव्हा मी माझे उजव्या हाताने माझे काळया कोटात उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवली असलेली लाच रक्कम 2 लाख रू काढून कात्रे साहेब यांना दिली. ती त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारली. मला त्यातले तुम्हाला काही देवू का? असे बोलल्यानंतर मी त्यांना लगेच यातले मला काही नको मला फक्त विषय संपवायचा आहे मला प्रॅक्टीस करायची आहे असे बोलल्यानंतर गै.अ कात्रे साहेब यांनी त्यांच्या उजव्या हाताने सदरची लाच रक्कम घेवून ते बसत असलेल्या लोखंडी टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवली. त्यानंतरही मी त्यांचेसोबत नमुद

ड्युटी अधिकारी

प्रकरणाबाबत बोलतच राहीलो व माझे मोबाईलचे व्हॉटसअपवरून गै.अ कात्रे साहेब यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबतचा नियोजीत ईशारा अंगठा (Thumb sign) असा सापळा अधिकारी यांना व्हॉट्सअँप मॅसेज करून नियोजीत ईशारा वेळ 13/48 वा केला. त्यावेळी सापळा पथकातील सर्व सदस्य, पंच क्रमांक 2 यांचेसह पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर चे आत येवून कात्रे साहेब बसलेल्या त्यांचे कक्षात जावून त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पंच क्र. 1 कावळे यास लाचरक्कम कोणी घेतली याबाबत सापळा अधिकारी यांनी विचारल्यानंतर पंच क्र. 1 यांनी सदर लाच रक्कम 2 लाख रूपये गै.अ कात्रे साहेब यांचेकडे बोट दाखवून यांनी घेतल्याचे सांगीतले. पंच क्र 1 यांनी बोट दाखवीलेल्या व्यक्तीला सापळा अधिकारी यांनी त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी एपीआय कात्रे असे सांगीतले. त्यावर सापळा अधिकारी यांनी लाच रक्कम कुठे ठेवली असे विचारले असता त्यांनी ते बसतात त्या टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवली असल्याचे सांगीतले. सापळा पथकासोबत असलेले पंच क्र. 2 यांनी त्या ड्राव्हरमधुन लाच रक्कम काढुन दिल्याने ताब्यात घेतली. त्यासंबंधाने सविस्तर नोंदी पंचनाम्यात घेण्यात आल्या आहेत. त्यानंतर पंच क्र. 1 च्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर वेळ 13.55 वा. बंद केला. माझी व गैरअर्जदार श्री. कात्रे साहेब यांची अंगझडती घेवुन पुढील प्रक्रीया करून सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी प्रिती शेंडे यांनी पंचनाम्यात घेतल्या आहेत.

तरी पोलीस ठाणे कोराडी नागपूर शहर येथील एपीआय कात्रे साहेब हे माझे व माझ्या पक्षकाराविरूद्ध दाखल असलेल्या अर्जाची सेटलमेंट करण्याकरीता 2,00,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी करून स्विकारल्याने माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष स्वाक्षरी

(प्रिती शेंडे ) (श्री त्रिषील खोब्रागडे )

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर

ड्युटी अधिकारी
पोलीस ठाणे, कोराडी
नागपूर शहर